# एकटा अयान पुणेरी पलटनवर पडला भारी! पटना पायरेट्सचा ४८-३७ ने नोंदवला स्पर्धेतील पहिला विजय

विशाखापट्टणम, ८ सप्टेंबर २०२५: प्रो कबड्डी लीग स्पर्धेच्या १२ व्या हंगामातील २२ वा सामना पुणेरी पलटन आणि पटना पायरेट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात पटना पायरेट्सकडून दमदार खेळ पाहायला मिळाला. दोन्ही संघातील चढाईपटूंनी एकसमान गुण कमावले. पण बचावत पुणेरी पलटनचा संघ मागे पडला. अयान एकटाच पुणेरी पलटनवर भारी पडला.  हा सामना पटना पायरेट्सने ४८- ३७ च्या फरकाने आपल्या नावावर केला.

या सामन्यात पटना पायरेट्सकडून अयानने एकट्याने २१ गुणांची कमाई केली. तर मिलन दहियाने ५ गुण कमावले. पुणेरी पलटनकडून सचिन तन्वरने ६ आणि अभिषेक गुंगेने ५ गुणांची कमाई केली. पण एकटा अयान पुणेरी पलटनवर भारी पडला.

या सामन्यातील दुसऱ्या चढाईत अयानने १ गुण घेत पटना पायरेट्सला दमदार सुरुवात करून दिली. प्रत्युत्तरात पंकज मोहितेने १ गुण घेत पुणेरी पलटनला खातं उघडून दिलं. अयानने पटना पायरेट्ससाठी दुसरी चढाई करताना सुपर रेड करत संघाला आघाडी मिळवून दिली. सामन्यातील पाचव्या मिनिटाला पुणेरी पलटनला पहिला मोठा धक्का बसला. पुणेरी पलटनचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह १०-३ गुणांसह ७ गुणांची आघाडी घेतली.

पटना पायरेट्सकडून अयान पुणेरी पलटनवर एकटाच भारी पडला. पूर्वार्धातील सुरुवातीचे १० मिनिटे पूर्ण झाल्यानंतर पटना पायरेट्सकडे १० गुणांची भक्कम आघाडी होती.

पूर्वार्धातील शेवटची ९ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनला दुसरा धक्का बसला. पुणेरी पलटनचा संघ दुसऱ्यांदा ऑलआऊट झाला. यासह पटनाने १९-६ गुणांसह १३ गुणांची आघाडी घेतली.  पूर्वार्धात पुणेरी पलटनचे चढाईपटू पूर्णपणे फ्लॉप ठरले. तर पटना पायरेट्सचे चढाईपटू पूर्णपणे चमकले. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पटना  पायरेट्सकडे २७-१० गुणांसह  १७ गुणांची भक्कम आघाडी होती.

उत्तरार्धातील सुरुवातीच्या मिनिटात पुणेरी पलटनने २ गुण घेत दमदार सुरुवात केली. उत्तरार्धातील सुरुवातीचे १० मिनिटे पूर्ण झाल्यानंतर पटना पायरेट्सकडे ३९-१९ ने भक्कम आघाडी होती. १२ व्या मिनिटाला पटना पायरेट्सचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. तरीसुद्धा पटना पायरेट्सचा संघ ४१-२४ गुणांसह १७ गुणांनी आघाडीवर होता. सामन्यातील शेवटच्या मिनिटापर्यंत पटना पायरेट्सचा संघ आघाडीवर होता. सामन्यातील शेवटच्या मिनिटाला पटना पायरेट्सचा संघ दुसऱ्यांदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने आघाडी ४६-३६ ने कमी केली. हा सामना पुणेरी पलटनने ४८-३७ ने आपल्या नावावर केला.